सत्यमेव जयते

महाराष्ट्राचे राज्यपाल

# डॉ. पी. सी. अलेक्झांडर

यांचे

# अभिभाषण

महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे मुंबई येथील संयुक्त अधिवेशन

१७ फेब्रुवारी १९९९

सभापती महोदय, अध्यक्ष महाराज आणि सन्माननीय सदस्यहो,

१.१. या वर्षाच्या राज्य विधानमंडळाच्या पहिल्या अधिवेशनात आपणा सर्वांचे स्वागत करताना मला अतिशय आनंद होत आहे. नवीन मुख्यमंत्री व त्यांच्या मंत्रिमंडळाचे मी हार्दिक अभिनंदन करतो.

१.२. माझ्या शासनाच्या कारकीर्दीचे हे पाचवे वर्ष सुरू झाले आहे. शासनाने बऱ्याच नवीन योजना हाती घेतलेल्या असून आतापर्यंत त्यापैकी अनेक पूर्ण झाल्या आहेत तर काहींची अंमलबजावणी सुरू आहे. माझ्या शासनाने या योजनांच्या अंमलबजावणीची गती वाढविण्याचे ठरविले असून एक संवेदनक्षम, कार्यक्षम व प्रभावी असे लोकाभिमुख प्रशासन देण्याची बांधिलकी स्वीकारली आहे.

२. आपल्या पहिल्या संविधान सभेचे सदस्य असलेले या विधानमंडळाचे सन्माननीय सदस्य श्री. रत्नाप्पा कुंभार यांच्या आणि या विधानमंडळाच्या अन्य मान्यवर सदस्यांच्या दु:खद निधनामुळे आपल्या राज्याची फार मोठी हानी झालेली आहे. आपण सर्वांनी त्यांना आदरांजली वाहूया अशी मी आपणास विनंती करतो.

३.१. औद्योगिक विकासाच्या क्षेत्रात आपल्या राज्याने आपले अव्वल स्थान कायम राखले असून कृषि, माहिती-तंत्रज्ञान व पायाभूत विकासाच्या क्षेत्रात नवीन उपक्रम सुरू केले आहेत हे माननीय सदस्यांना सांगताना मला आनंद होत आहे.

३.२. महाराष्ट्राने औद्योगिक क्षेत्रात आपले अग्रस्थान कायम राखले आहे. आर्थिक उदारीकरणाचा मार्ग अवलंबिण्यात आल्यापासून सुमारे ६,००० उद्योजकांनी आवेदनपत्रे दाखल केली आहेत आणि ४८१ इरादापत्रे देण्यात आली आहेत. त्याव्यतिरिक्त, निर्यात अभिमुख ५०२ कारखान्यांची राज्यात नोंदणी करण्यात आली आहे. या कारखान्यांमध्ये

सुमारे १,३६,००० कोटी रुपये इतकी गुंतवणूक होईल आणि त्यात सुमारे १२ लाख लोकांना रोजगार मिळेल अशी अपेक्षा आहे. याशिवाय राज्यातील १,१६६ औद्योगिक प्रकल्पांमध्ये २१,४६२ कोटी रुपयांची थेट विदेशी गुंतवणूक होणार आहे.

३.३. महाराष्ट्रातील माहिती-तंत्रज्ञान उद्योगाला जागतिक स्तरावर स्पर्धात्मक दर्जा प्राप्त करून देण्यासाठी माझ्या शासनाने १९९९ हे वर्ष माहिती-तंत्रज्ञान वर्ष म्हणून साजरे करण्याचे ठरविले असून त्यासाठी माहिती-तंत्रज्ञानविषयक एक व्यापक धोरण आखले आहे. त्यामध्ये, मनुष्यबळ विकास, पायाभूत सुविधा, आर्थिक स्वरुपाची व अन्य प्रकारची प्रोत्साहने आणि शासकीय व्यवहारांचे संगणकीकरण यादृष्टीने महत्त्वाच्या क्षेत्रांवर व धोरणात्मक कृतींवर भर देण्यात आलेला आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व सिडको यांनी नवी मुंबई, पुणे व नागपूर येथे माहिती-तंत्रज्ञान संकुले विकसित केली असून त्यामुळे सॉफ्टवेअरचा व्यवसाय करणाऱ्यांना त्यांची उद्योग केंद्रे त्वरित सुरू करणे शक्य होईल.

३.४. जनतेला संवेदनक्षम प्रशासन देण्याच्या हेतूने माझ्या शासनाने, जनता व लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागण्या विचारात घेऊन, १ जुलै १९९८ पासून वाशिम व नंदुरबार या दोन नवीन जिल्ह्यांची निर्मिती केली आहे. पुनर्रचित धुळे जिल्ह्यात, दिनांक १० जुलै १९९८ पासून ' शिरपूर ' हा एक नवीन उप विभाग तसेच अमरावती जिल्ह्यात, दिनांक १४ जुलै १९९८ पासून ' धामणगाव रेल्वे ' हा नवा तालुका निर्माण करण्यात आला आहे. माझ्या शासनाने, विद्यमान परभणी व भंडारा या जिल्ह्यांचे विभाजन करून हिंगोली व गोंदिया हे दोन नवीन जिल्हे निर्माण करण्याचे देखील ठरविले आहे. हे जिल्हे दिनांक १ मे १९९९ पासून अस्तित्वात येतील.

३.५. राज्यातील कृषि व संलग्न क्षेत्रांत झपाट्याने होत असलेल्या प्रगतीची शेतकरी, गुंतवणूकदार व उद्योजक यांना माहिती करून देण्याकरिता आणि कृषि उत्पादन प्रक्रिया उद्योगात देशी व विदेशी

गुंतवणूकदारांनी गुंतवणूक करावी यासाठी त्यांना उत्तेजन मिळावे याकरिता, माझ्या शासनाने दिनांक ६ ते ९ नोव्हेंबर १९९८ या कालावधीत मुंबईत '' अॅग्रो अॅडव्हान्टेज महाराष्ट्र '' हा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमामध्ये जागतिक गुंतवणूकदार परिषद आणि आंतरराष्ट्रीय कृषि-अन्नधान्य तंत्रज्ञान प्रदर्शनाचा अंतर्भाव होता. राज्याच्या कृषि-अन्नधान्य क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणात उपलब्ध असलेल्या संधीविषयी जाणीव करून देण्याच्या कामी ही परिषद यशस्वी ठरली. अदमासे पाच लाख शेतकऱ्यांनी या भव्य प्रदर्शनाला भेट दिली.

४. संपूर्ण वर्षात कायदा व सुव्यवस्था तसेच कामगार क्षेत्रातील परिस्थिती शांततापूर्ण आणि समाधानकारक होती. न्यायमूर्ती श्रीकृष्ण आयोग, न्यायमूर्ती दाणी आयोग अणि न्यायमूर्ती गुंडेवार आयोग यांचे तीन संवेदनशील अहवाल सादर झालेले असताना देखील माझ्या शासनाने कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती यशस्वीरीत्या पूर्ण नियंत्रणाखाली ठेवली आहे. राज्यामध्ये या वर्षात जातीय स्वरूपाची कोणतीही अनुचित घटना घडलेली नाही, ही अतिशय समाधानाची बाब आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत गुन्ह्यांच्या संख्येत घट झालेली आहे. माझ्या शासनाने संघटित गुन्हेगारीला आळा घालण्याकरिता आणि छोट्या गुंतवणूकदारांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्याकरिता दोन नवीन कठोर कायदे करण्याचे ठरविले आहे. पोलीस दल अधिक प्रभावी करण्यासाठी, त्यांना अत्याधुनिक शस्त्रे, नवीन वाहने आणि दूरसंदेशवहनाच्या प्रगत यंत्रणा पुरवण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे, पोलीस ठाण्यांची संख्या वाढवण्यात आलेली आहे. पोलिसांच्या कल्याणास चालना देण्यासाठी पोलीस कल्याण निधीतील अंशदानाच्या रकमेत लक्षणीय वाढ करण्यात आली आहे.

५.१. दीर्घकाळ अनिर्णीत असलेल्या महाराष्ट्र कर्नाटक सीमा-प्रश्नावर सामंजस्यपूर्ण तोडगा काढण्यासाठी माझे शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. या दीर्घकाळ अनिर्णीत असलेल्या प्रश्नावर सर्वांना

मान्य होईल असा तोडगा काढण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती माननीय पंतप्रधानांची तसेच कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांची भेट घेणार आहे.

५.२. मराठवाडा मुक्तीसंग्रामाची स्मृती चिरंतन ठेवण्यासाठी, मराठवाड्याच्या प्रत्येक जिल्ह्यात एक स्मृतीस्तंभ उभारण्याचे माझ्या शासनाने ठरविले आहे.

५.३. माझे शासन, मराठवाड्यातील वेरूळ येथे शहाजीराजे भोसले यांचे आणि मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तर रायगड जिल्ह्यात विनोबा भावे व सी. डी. देशमुख यांचे स्मारक उभारण्याचा विचार करीत आहे.

५.४. राज्यातील दळणवळण सेवा अधिक चांगल्या व्हाव्यात यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सोयींमध्ये वाढ करण्यासाठी आवश्यक तेथे धावपट्ट्या बांधण्याचा एक कार्यक्रम शासनाने हाती घेतला आहे. त्यापैकी, यवतमाळ येथील धावपट्टीचा वापर सुरू झाला आहे. मुंबईतील वर्ल्ड ट्रेड सेंटर जवळील हेलिपॅडचे बांधकाम, तसेच रत्नागिरी येथील धावपट्टीचा दर्जा सुधारण्याचे काम आता पूर्ण झाले आहे. गोंदिया येथील धावपट्टीचे काम सुरू झाले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील परूळे आणि बीड जिल्ह्यातील परळी येथील धावपट्ट्यांच्या संबंधातील सर्वेक्षणाचे कामही पूर्ण झाले असून त्यांच्या बांधकामास लवकरच सुरूवात होईल अशी अपेक्षा आहे. परूळे येथे धावपट्टी बांधण्यात आल्यामुळे, पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आलेल्या सिंधुदुर्ग या जिल्ह्याच्या किनारपट्टीमध्ये पर्यटनाच्या विकासास चालना मिळेल.

५.५. दुसऱ्या महायुद्धातील माजी सैनिकांना किंवा त्यांच्या विधवांना द्यावयाच्या आर्थिक मदतीमध्ये शासनाने १ जानेवारी १९९९ पासून दरमहा ३०० रुपयांवरून ६०० रुपयांपर्यंत वाढ केली आहे. १७,००० कुटुंबांना याचा लाभ होणार असून त्यासाठी प्रतिवर्षी, १७.४४ कोटी

रुपये एवढा खर्च येणार आहे. त्याचप्रमाणे, बंडाळीमध्ये किंवा अतिरेक्यांच्या कारवायांमध्ये मारल्या गेलेल्या जवानांच्या कुटुंबांना, १ मे १९९५ पासून भूतलक्षी प्रभावाने प्रत्येक कुटुंबामागे २ लाख रुपयांची ठोक रक्कम आर्थिक मदत म्हणून देण्यात येईल.

६.१. राज्यातील विविध प्रदेशांचा समतोल व समुचित विकास साधण्याच्या आपल्या ध्येयाशी माझे शासन बांधील आहे. तीन विकास मंडळांची स्थापना करण्यात आल्यापासून शासनाने या तीन प्रदेशातील लोकसंख्येची टक्केवारी आणि दांडेकर समितीने निश्चित केलेला अनुशेष यांच्या आधारे वार्षिक योजना आणि अनुशेष निधींचे समन्याय वाटप केले जाईल याची सुनिश्चिती केली आहे. एका प्रदेशाला वाटप करण्यात आलेल्या निधीचे दुसऱ्या प्रदेशाकडे हस्तांतरण केले जाणार नाही याचीही शासनाने सुनिश्चिती केली आहे. ह्याशिवाय प्रादेशिक-दृष्ट्या महत्वाच्या असलेल्या विशेष योजना हाती घेण्यासाठी या तीन विकास मंडळांना विशेष वाटपाची रक्कम म्हणून प्रत्येक वर्षी १०० कोटी रुपयांची रक्कम दिली जाते. अभ्यासगटामार्फत निवडक क्षेत्रातील योजनांच्या अंमलबजावणीचे मूल्यमापन करून त्यातून प्राप्त होणाऱ्या निष्कर्षांचा त्यांच्या भविष्यातील नियोजनासाठी उपयोग करण्याचे निदेश मी विकास मंडळांना दिले आहेत. राज्याच्या साक्षरता कार्यक्रमातही सक्रिय सहभागी होण्याचे निदेश मी त्यांना दिले आहेत.

६.२. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील गरीबांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचे काम अखंडपणे चालू आहे. मजुरीच्या किमान दरात, दिवसाला २० रुपयांवरून ३५ रुपये इतकी वाढ करण्यात आली आहे.

७.१. कृषि विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयांची पुनर्रचना करून शेतकऱ्यांना अधिक प्रभावी व कार्यक्षम सेवा पुरविण्याच्या दृष्टीने, कृषि, फलोत्पादन व मृद संधारण ही संचालनालये कृषि आयुक्तांच्या नियंत्रणाखाली आणण्यात आली आहेत.

७.२. एकात्मीकृत दुग्ध व्यवसाय विकास कार्यक्रम सध्याच्या पाच जिल्ह्यांबरोबरच ठाणे, रायगड, परभणी, अकोला, वाशीम आणि जालना

या आणखी सहा जिल्ह्यांना लागू करण्यात आला आहे. कणकवली व यवतमाळ येथे, प्रतिदिन २०,००० लिटर क्षमतेच्या नवीन दुग्धशाळा स्थापन करण्यात आल्या असून चंद्रपूर येथील दुग्धशाळेची क्षमता प्रतिदिन ५०,००० लिटरपर्यंत वाढविण्यात आली आहे. या कार्यक्रमांतर्गत परभणी, अकोला व जालना या जिल्ह्यांमध्ये प्रतिदिन १०,००० लिटर क्षमतेची प्रशीतन केंद्रे उभारण्यात येतील. माझ्या शासनाने दुग्ध व्यवसायात महिलांच्या सहभागास प्राधान्य दिले असून त्या दृष्टीने, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध संघामार्फत नाशिक, सांगली, उस्मानाबाद, नांदेड, लातूर, बुलढाणा, बीड व वर्धा या ८ जिल्ह्यांमध्ये महिलांच्या सहकारी दूध उत्पादक संस्था केंद्रीय सहाय्याने स्थापन करण्यात आल्या आहेत.

७.३. पिढीजात मासेमारीचा व्यवसाय करणाऱ्या मच्छीमार बांधवांचे हित जपण्यासाठी माझ्या शासनाने राज्याच्या जलसीमा क्षेत्राच्या रक्षणासाठी चार गस्ती नौका वापरात आणल्या आहेत. फ्रेंच सरकारच्या सहाय्याने गोड्या पाण्यातील कोळंबी बीज उत्पादन केंद्र स्थापन करण्याचेही शासनाने ठरवले आहे. या उत्पादन केंद्रात दरवर्षी चाळीस दशलक्ष कोळंबी बीजांचे उत्पादन होईल.

८.१. विद्युत निर्मितीमध्ये महाराष्ट्र राज्य अग्रेसर आहे. अधिक वीज उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने खापरखेडा येथे दोन जादा वीज निर्मिती केंद्रांचे काम सुरू करण्यात आले असून ही केंद्रे २००० सालापर्यंत कार्यान्वित होतील अशी अपेक्षा आहे.

८.२. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने, स्वतःच्या वापरासाठी विजेची निर्मिती करण्याकरिता १४७८ मेगावॅट क्षमतेची वीज निर्मिती यंत्रणा उभारण्यास परवानगी दिलेली असून त्यापैकी ४७६ मेगावॅट क्षमतेची यंत्रणा कार्यान्वित झालेली आहे. माझ्या शासनाने अपारंपरिक ऊर्जेच्या निर्मितीस प्राधान्य दिले असून उद्योजकांना या क्षेत्राकडे आकर्षित करण्यासाठी प्रोत्साहनपर लाभ देऊ केले आहेत. आगामी तीन वर्षांमध्ये, सह-निर्मितीद्वारे ३०० मेगावॅट आणि पवन ऊर्जा प्रकल्पांद्वारे १०० मेगावॅट एवढी जादा क्षमता निर्माण होईल, अशी अपेक्षा आहे.

८.३. या जादा क्षमतेमुळे महाराष्ट्र हे वीज कपातीची गरज नसलेले देशातील एकमेव राज्य झाले आहे.

८.४. माझ्या शासनाने राज्य विद्युत नियामक आयोग स्थापन करण्याचे ठरविले असून त्याचे काम लवकरच सुरू होईल. सुरूवातीला या आयोगाकडे वीजदर आणि अर्थसहाय्य यांचे सुसूत्रीकरण करण्यासंबंधीची कामे सोपवण्यात येतील.

९.१. नैसर्गिक आपत्तींची झळ पोचलेल्या व्यक्तींना दिल्या जाणाऱ्या मदतीच्या प्रमाणात या वर्षामध्ये वाढ करण्यात आली. १९९८ च्या पावसाळ्यात अतिवृष्टी व पूर यांची झळ पोचलेल्या व्यक्तींना वाढीव दराने आर्थिक मदत देण्यात आली.

९.२. जागतिक बँक व इतर संस्था यांच्या सहाय्याने हाती घेण्यात आलेल्या महाराष्ट्र आपत्कालीन भूकंप पुनर्वसन कार्यक्रमाद्वारे, १९९३ च्या भूकंपातील सर्व भूकंपग्रस्त गावांचे, पुनर्वसन करण्याचे काम यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले आहे, हे सांगतांना मला आनंद वाटतो. शासनाने संपूर्ण देशाला मार्गदर्शक ठरू शकेल अशी एक जिल्हानिहाय राज्य आपत्ती व्यवस्थापन योजना देखील तयार केली असून त्यामध्ये प्रत्येक जिल्ह्यात नियंत्रण कक्ष असतील व ते व्ही.एच.एफ. व व्ही-सॅट यंत्रणेने विभागीय व राज्य मुख्यालयांना जोडलेले असतील.

१०.१. वन्यजीवनाविषयीची आस्था वाढीस लागावी यासाठी शासनाने बोरीवली येथील राष्ट्रीय उद्यानात एक आधुनिक व्याघ्र विहार स्थापन केला असून खुद्द महानगरातच असणारा तो देशातील एकमेव व्याघ्र विहार आहे.

१०.२. पर्यावरण व प्रदूषणविषयक विनियमन कायद्यांची कठोर अंमलबजावणी करून नागरी क्षेत्रातील प्रदूषणास आळा घालून पर्यावरणाचे संरक्षण करण्यास माझे शासन बांधील आहे. पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने वन संरक्षणाला आत्यंतिक महत्त्व असल्याने वनसंरक्षणातील व त्याच्या व्यवस्थापनातील जनतेच्या सहभागास मोठ्या प्रमाणात उत्तेजन देण्यात येत आहे.

११.१. प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने माझ्या शासनाने इयत्ता पहिली ते पाचवीच्या वर्गांसाठी अपेक्षित क्षमतांवर आधारित शालेय अभ्यासक्रमात सुधारणा केली आहे. या अंतर्गत एक राज्यव्यापी प्राथमिक शिक्षक भरीव प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. या कार्यक्रमाखाली पहिली ते चौथी इयत्तेच्या सुमारे ३.५ लाख प्राथमिक शिक्षकांना सखोल प्रशिक्षण देण्यात आले असून आता या वर्षी, पाचव्या इयत्तेच्या आणखी एक लाख प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षण देण्याचे योजिले आहे.

११.२. निरक्षरतेच्या निर्मूलनास माझ्या शासनाने सर्वोच्च प्राधान्य दिले असून त्यातही महिला साक्षरतेवर भर देण्यात येत आहे. १८ जिल्ह्यांमध्ये संपूर्ण साक्षरता कार्यक्रम पूर्ण झाला असून ८ जिल्ह्यांमध्ये साक्षरोत्तर कार्यक्रम पूर्ण झाला आहे. पाच जिल्ह्यांमध्ये निरंतर शिक्षण कार्यक्रमाची तयारी पूर्ण झाली आहे.

११.३. या सन्माननीय सभागृहाच्या सदस्यांना हे ऐकून आनंद वाटेल की, या वर्षाच्या गणतंत्र दिनाच्या संचलनामध्ये आपले राष्ट्रीय छात्रसेना पथक सलग चौथ्या वर्षी, '' पंतप्रधान ध्वजा '' चे मानकरी ठरले आहे.

१२. अलिकडेच कार्यरत झालेल्या अकरा क्रीडा प्रबोधिनींमधील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदके मिळवली आहेत, याचा मला आनंद वाटतो. शासनाने ७ जिल्हा मुख्यालयांच्या ठिकाणी, क्रीडासंकुले स्थापन करण्यासाठी पावले उचलली असून त्याकरिता, प्रत्येकी २ कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित आहे.

१३. अन्न व औषध प्रशासनाच्या कामकाजाला गती देण्यासाठी त्याचे संगणकीकरण करण्यात आले आहे. गुटखा सेवनाचे दुष्परिणाम व एड्सला प्रतिबंध करण्यासाठी घ्यावयाची खबरदारी या संबंधात जनजागृती करण्याकरिता शासन उपाय योजीत आहे.

१४.१. वरळी-वांद्रे सेतूमार्ग प्रकल्पाला भारत सरकारच्या पर्यावरण मंत्रालयाने अलिकडेच मंजुरी दिलेली आहे, हे आपल्याला सांगण्यास मला आनंद वाटतो. या प्रकल्पातील मुख्य पुलाची लांबी ३.२ किलोमीटर इतकी असेल. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबई शहर ते पश्चिम उपनगरे या दरम्यानची वाहतूक अधिक वेगाने होऊ शकेल.

१४.२. मुंबई महानगर प्रदेशातील वाहतुकीच्या स्थितीत सुधारणा करण्याचा माझ्या शासनाचा निर्धार आहे. आपण केलेल्या पाठपुराव्याच्या परिणामी, केंद्र शासनाने मुंबई रेल्वे विकास महामंडळाची स्थापना करण्यास मंजुरी दिलेली आहे. मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प-दोनमधील प्रकल्पग्रस्त कुटुंबांचे पुनर्वसन करण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार आहेत.

१५. माझ्या शासनाने गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ स्थापन केले असून राज्यातील अशा प्रकारचे हे पाचवे महामंडळ आहे. अधिकाधिक जमीन सिंचनाखाली आणण्याच्या शासनाच्या प्रयत्नांना या पाच महामंडळांमुळे गती प्राप्त होईल.

१६.१. चालू वर्षी गावे रस्त्यांनी जोडण्याचा कार्यक्रम अधिक जोमाने हाती घेण्यात आला आहे. आतापर्यन्त, महाराष्ट्रातील ९४ टक्के गावे बारमाही रस्त्यांनी जोडण्यात आली आहेत. आदिवासी आणि दुर्गम क्षेत्रामध्ये तसेच गडचिरोली, चंद्रपूर व भंडारा जिल्ह्यांमधील नक्षलग्रस्त भागामध्ये बारमाही रस्ते बांधण्यावर माझ्या शासनाचा अधिक भर आहे. ग्रामीण क्षेत्रातील रस्त्यांची सुधारणा व डांबरीकरण करण्याच्या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमाकरिता '' नाबार्ड '' कडून २५० कोटी रुपयांचे आर्थिक सहाय्य मिळविण्यात आले आहे.

१६.२. रस्ते विकासाच्या कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने महत्त्वाचे रस्ते प्रकल्प खाजगी वित्तव्यवस्थेद्वारे हाती घेण्याचे ठरविले आहे. ३५० कोटी रुपये खर्चाच्या २९ प्रकल्पांचे काम देखील सध्या विविध टप्प्यांवर चालू आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने मुंबई-पुणे द्रुत महामार्ग, तसेच मुंबई शहरातील

५० उड्डाण पुलांचे बांधकाम हाती घेतले असून मार्च २००० पूर्वी हे प्रकल्प पूर्ण होतील अशी अपेक्षा आहे. मुंबई-नाशिक आणि मुंबई-तलासरी हे द्रुत महामार्ग खाजगी वित्तव्यवस्थेद्वारे बांधण्याचे देखील माझ्या शासनाने ठरविले आहे.

१७. जून १९९५ नंतरच्या काळात भारत सरकारने अनेक वेळा भाववाढ केलेली असताना देखील माझ्या शासनाने पाच जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती जून १९९५ च्या भाव पातळीवर स्थिर ठेवलेल्या आहेत. या पाच जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती स्थिर ठेवणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे. राज्याच्या या अर्थसहाय्यामुळे माझ्या राज्यातील धान्याची उचल वाढली असून ती १९९४-९५ मधील ८ लाख टनांवरून १९९८-९९ मध्ये १९ लाख टनांपर्यंत गेली आहे. या वाढीव धान्य पुरवठ्याचा लाभ विशेषकरून मेळघाट, गडचिरोली आणि नंदुरबार यांसारख्या कुपोषणाची समस्या असलेल्या भागांना झालेला आहे. शिधापत्रिका धारकांना अर्थसहाय्यित दराने डाळ व पामोलिन तेल यांचे वाटप करण्यात आले आहे. माझ्या शासनाने केलेल्या विविध उपाययोजनांमुळे मुंबई हे इतर महानगरांपेक्षा सर्वांत कमी दरवाढ झालेले शहर म्हणून गणले गेले आहे.

१८.१. माझ्या शासनाने, यावर्षी २० नवीन लहान औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन केल्या आहेत. या प्रत्येक संस्थेमध्ये, प्रत्येक सत्रात, दारिद्र्यरेषेखालील ८० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याची सोय करण्यात आली आहे.

१८.२. यावर्षी देखील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना आणि निश्चित केलेल्या मागासवर्गीय गटांच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेषांचे वाटप करण्याकरिता २०.६५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

१९.१. माझ्या शासनाने जागतिक बँकेकडून ७२७ कोटी रुपये इतके वित्तीय सहाय्य घेऊन महाराष्ट्र आरोग्य यंत्रणा विकास प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याचे ठरविले आहे.

१९.२. माझे शासन, जागतिक बँकेच्या सहाय्याने सुमारे २५८ कोटी रुपये खर्चाच्या एड्स नियंत्रण प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याची देखील अंमलबजावणी करणार आहे.

१९.३. ज्यामध्ये प्रामुख्याने महिला व बालके यांच्या आरोग्य विषयक प्रश्नावर सर्वांगीण भर देण्यात आलेला आहे अशा प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमाची राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत राज्यामध्ये अंमलबजावणी करण्यात येत आहे.

१९.४. मला हे सांगताना आनंद होत आहे की, शासनाने राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी करून यावर्षी १०१ टक्के बालकांना पोलिओचे डोस देण्याचा उच्चांक गाठला आहे. या मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे पोलिओ रुग्णांच्या संख्येत लक्षणीय घट झाली आहे. २००० सालापर्यंत कुष्ठरोग निर्मूलन करण्याच्या दिशेने शासन वाटचाल करीत असून त्यासाठी राज्यभर कुष्ठरोग सर्वेक्षण व शोध मोहिमांचे आयोजन केले आहे.

२०. कापूस उत्पादकांच्या हितरक्षणासाठी, कापूस एकाधिकार खरेदी योजनेला ३० जून १९९९ पर्यन्त एक वर्षासाठी मुदतवाढ मिळविण्यात माझ्या शासनाला अथक प्रयत्नांनंतर यश आले आहे. या योजनेला आणखी ५ वर्षांच्या काळासाठी मुदतवाढ मिळावी यासाठी प्रयत्न चालू आहेत.

२१.१. रोजगाराच्या अधिक संधी निर्माण करण्यासाठी ग्रामविकास, पाटबंधारे, कृषि, उद्योग आणि सार्वजनिक बांधकाम या विभागातील विद्यमान योजनांची अंमलबजावणी करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. तसेच निरनिराळ्या विभागांच्या रोजगार व स्वयंरोजगार योजनांमार्फत रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत आणि आतापर्यंत सात लाख बेरोजगार युवकांना रोजगार आणि स्वयंरोजगार पुरविण्यात आले आहेत.

२१.२. युवकांनी पगारी नोकऱ्यांच्या मागे न लागता स्वयंरोजगाराकडे वळावे यासाठी माझे शासन त्यांना उत्तेजन देत आहे. नव्याने निर्माण करण्यात आलेला रोजगार व स्वयंरोजगार विभाग या कामाचे संनियंत्रण व समन्वयन करीत आहे.

२१.३. माझ्या शासनाने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ स्थापन केले असून या महामंडळामार्फत आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील युवकांना वित्तीय सहाय्य पुरवले जाईल.

२२. माझ्या शासनाने विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी स्वतंत्र विभाग निर्माण करण्याचे ठरविले आहे. तसेच शासनाने, विकलांग व्यक्ती (समान संधी, हक्क संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ याच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याकरिता एक राज्यस्तरीय समन्वय समिती व अपंग कल्याण आयुक्त यांची नेमणूक केलेली आहे. व्यसनमुक्तीच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्था व व्यक्ती यांना पुरस्कार देण्याचेही माझ्या शासनाने ठरवले आहे.

२३.१. आदिवासी विद्यार्थ्यांना इयत्ता बारावी पर्यन्तचे उच्च शिक्षण त्यांच्या घरांपासून जवळच्या ठिकाणी घेता येणे शक्य व्हावे म्हणून शासनाने १४ आदिवासी उपयोजना जिल्ह्यांपैकी प्रत्येक जिल्ह्यात १९९९-२००० या वर्षापासून कला व विज्ञान शाखांतील ३१ कनिष्ठ महाविद्यालये सुरू करण्याचे ठरविले आहे. १९९८-९९ या वर्षात आदिवासी विद्यार्थ्यांकरिता २१ नवीन वसतिगृहे राज्यात सुरू करण्यात आली असून त्यामुळे त्यांना उच्च शिक्षणाचा लाभ घेणे शक्य झाले आहे. माझ्या शासनाने, १९९८-९९ या वर्षात १४२ आदिवासी आश्रमशाळांना मंजुरी दिली असून आदिवासी आश्रमशाळांचा अनुशेषही १९९९-२००० या वर्षात भरून काढण्यात येईल.

२३.२. आदिवासी उपयोजना क्षेत्रात नवसंजीवन योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात आल्याने बाल मृत्युच्या प्रमाणात लक्षणीय घट झाली आहे.

२३.३. मेळघाट क्षेत्रातील सर्व वाड्या आणि खेडी रस्त्याने जोडण्याकरता चालू वर्षात पुरेशी तरतूद करण्यात आली होती. त्यामुळे या क्षेत्रातील रस्त्यांच्या दळणवळणात सुधारणा होण्यास फार मोठी मदत झाली.

२३.४. माझ्या शासनाने, अनुसूचित जमातींकरिता '' शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ '' स्थापन केले आहे. हे महामंडळ, आदिवासींना बीज भांडवल, अर्थसहाय्य, कर्ज, इत्यादींच्या रूपाने वित्त सहाय्य देईल. राज्य शासनाने या प्रयोजनाकरिता, भाग भांडवल म्हणून ५ कोटी रुपये मंजूर केले आहेत.

२३.५. माझ्या शासनाने थकबाकीदार आदिवासी कुटुंबांना देखील खावटी कर्जाचे वाटप करण्याचे ठरविले आहे.

२३.६. राज्य पोलीस दलामध्ये आदिवासी महिलांना अधिकाधिक प्रतिनिधित्व देण्यासाठी, माझ्या शासनाने आदिवासी महिलांकरिता सेवा-पूर्व प्रशिक्षण केंद्रे स्थापन करण्याचे प्रस्तावित केले आहे.

२४.१. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे काम जोमाने चालू आहे. झोपडपट्टी पुनर्वसनासाठी आलेल्या ४८३ प्रस्तावांपैकी २१४ प्रस्तावांना बांधकाम सुरू करण्याचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

२४.२. मुंबई बेटाच्या नागरी क्षेत्राचा कायापालट करण्यासाठी, उपकर आकारण्यात आलेल्या १८,००० पेक्षा अधिक जुन्या इमारतींच्या पुनर्बांधणीचे काम सुकर व्हावे म्हणून माझ्या शासनाने काही धोरणात्मक बाबी जाहीर केल्या आहेत. मुंबईच्या उपनगरांमधील जुन्या व मोडकळीला आलेल्या इमारतींच्या समस्या हाताळण्यासाठी एक स्वतंत्र समिती स्थापन करण्यात आली आहे.

२४.३. माझ्या शासनाने, राष्ट्रीय वार्धक्य वेतन योजना, राष्ट्रीय कुटुंबलाभ योजना आणि राष्ट्रीय प्रसूतिलाभ योजना यांमार्फत यावर्षी २ लाखांपेक्षाही अधिक वृद्ध आणि निराश्रित व गरीब व्यक्तींना सामाजिक सुरक्षा पुरवण्याची तरतूद केली आहे.

२५. सर्व खेड्यांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याच्या शासनाच्या बांधिलकीचा एक भाग म्हणून नऊ जिल्हे याआधीच टँकरमुक्त करण्यात आले आहेत.

२६.१. एकात्मीकृत पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाखालील कामे ८,५४९ गावांमध्ये हाती घेण्यात आली आहेत. आतापर्यंत १,५७७ गावांमध्ये ६,४४५ पाणलोट क्षेत्रांचे काम पूर्ण झाले आहे.

२६.२. जवाहर रोजगार कार्यक्रम आणि आश्वासित रोजगार योजना यांसारखे केंद्र पुरस्कृत रोजगार कार्यक्रम माझे शासन जोरदारपणे राबवीत आहे. दारिद्र्यरेषेखालील शेतकऱ्यांसाठी यावर्षी दशलक्ष विहीर योजनेअंतर्गत एकूण ४,०६६ जलसिंचन विहिरींचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

२७.१. माझ्या शासनाने या वर्षात वेगवेगळ्या पातळीवर ७ नवीन न्यायालये तसेच स्त्रियांवरील अत्याचारांसंबंधीची प्रकरणे त्वरेने निकालात काढण्यासाठी ठाणे, पुणे आणि कोल्हापूर येथे तीन विशेष न्यायालये स्थापन केली आहेत. महाराष्ट्र राज्य विधिविषयक सेवा प्राधिकरणाच्या विद्यमाने या वर्षी ४१० लोकन्यायालये भरविण्यात आली. जवळजवळ २५,३०० लोकांनी या न्यायालयांचा लाभ घेतला व त्या न्यायालयांकडून १०,१२१ प्रकरणे निकालात काढण्यात आली व व्यथित पक्षकारांना जवळजवळ २३ कोटी रुपये एवढ्या रकमेची भरपाई मिळाली. या योजनेअन्वये एकंदर ४,२३१ लोकांना मोफत कायदेविषयक सहाय्य देण्यात आले.

२७.२. प्रशासनात मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर करण्याच्या माझ्या शासनाच्या अभिवचनाला अनुसरून, राज्यातील सर्व दुय्यम न्यायालयांनी आपले निर्णय मराठीतून देणे अनिवार्य करणारी एक अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

२८.  माननीय सदस्यहो, माझ्या शासनाने केलेली काही महत्त्वाची कामे आणि हाती घेतलेले उपक्रम यांची ठळक वैशिष्ट्ये मी आपणांसमोर मांडली आहेत. एक संवेदनक्षम, जबाबदार, प्रगत आणि सुप्रशासित राज्य म्हणून असलेले महाराष्ट्राचे स्थान कायम राहावे यासाठी या योजना राबविण्याच्या कामी आपण आपले सहकार्य द्यावे अशी मी दोन्ही सभागृहांना विनंती करतो.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !!**

मुद्रणस्थळ : शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई